**नियमीत फौजदारी खटला क्र. ९९/२०१६**

निशाणी क्र. ६७

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवरील जबाब**

मी याद्वारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नांव – विजयकुमार गोविंद सावंत

माझे वय – ३४ वर्षे

व्यवसाय – नोकरी

राहण्याचे ठिकाण – सांगली

**सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पखाली यांचेमार्फत**

दि. १४.०७.२०१५ रोजी मी हनुमाननगर, सांगली येथे राहावयास होतो. त्यादिवशी संध्याकाळी माझे वडिल बाहेर फिरत होते. त्यावेळेस बाळू कांबळे व त्याचे नातेवाईक हे शिवीगाळ करत होते. त्यावेळेस माझ्या वडिलांनी त्यांना असे म्हटले की सारखे काय शिवीगाळ करता, मला मारणास असशील तर मार. त्यामुळे माझे वडिल व बाळू कांबळे आणि त्याच्या नातेवाईकांमध्ये बाचाबाची चालू झाली. आवाज आल्यामुळे मी व माझा भाऊ राजेश असे दोघे घराबाहेर आलो व पाहिले असता आरोपी बाळू कांबळे व सायबू केंगार हे दोघे काठीने माझ्या वडिलांना मारत होते. बाळू कांबळे याने माझ्या वडिलांच्या डोक्यात काठीने मारले. मी सोडविण्यासाठी गेलो असता सायबु केंगार याने काठीने माझ्या डाव्या हातावर मारले. त्यावेळेस माझी आई सोडविण्यासाठी गेली असता तिला बाळू कांबळेची पत्नी कुसुमा कांबळे, भिमा तांबे, रेणुका केंगार यांनी तिला मारहाण केली. माझा भाऊ राजेश यांस बाळू कांबळे याची मुलगी पार्वती हिने धक्काबुक्की केली. वडिलांच्या डोक्यात मारहाण केल्यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्त येत होते. त्यानंतर आमचे शेजारी शामसुंदर शर्मा व इतर लोकांनी वडिलांना बाजूला केले व शामसुंदर शर्मा यांच्या गाडीतून वडिलांना उपचारासाठी शासकिय दवाखान्यात नेले. त्याठिकाणी माझ्यावर आणि माझ्या वडिलांवर उपचार करण्यात आले. माझ्या वडिलांचा पोलिसांनी जबाब नोंदविला होता. माझे वडिल आजरोजी हयात नाहीत. घटनेबाबत माझ्या आईने फिर्याद दाखल केली होती. घटनेबाबत पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. आरोपी बाळू कांबळे व सायबु केंगार यांनी ज्या काठयांनी आम्हाला

मारहाण केली त्या आर्टिकल अ वरील काठया आता मला दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहेत. माझ्या वडिलांचे आर्टिकल ब वरील टीशर्ट व लुंगी आता मला दाखविण्यात आली. ते तेच आहे. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात हजर नाहीत. (आरोपींतर्फे हजेरी माफीचा अर्ज देण्यात आला आहे.)

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. वाय. बी. नाझरे**

२. आम्ही उपरोक्त पत्त्यावर अंदाजे तीस वर्षांपासून राहतो. त्यामुळे शेजारी राहणाऱ्या लोकांकडे कामानिमित्त आमचे जाणे येणे असते. आरोपी क्र. १, ३ व ५ हे आमच्या शेजारी राहावयास होते. अनिल पसारे हा केवळ कामानिमित्त आरोपी क्र. १ कडे येत होता का याबाबत मला कल्पना नाही. आरोपी क्र. ३ व ५ यांचे कायमचे गाव मंगळवेढा असल्याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. ७ हा शामरावनगर, सांगली येथे वास्तव्यासाठी होते.

प्रश्न – आरोपी क्र. १ कडे इतर आरोपी हे दवाखान्याकरिता अथवा इतर घरगुती कार्यक्रमाकरिता येत होते ?

उत्तर – घटनेच्या दिवशी सर्व आरोपी हे त्याठिकाणी हजर होते.

३. हे म्हणणे खरे आहे की आमच्या घराच्या आजूबाजूस मुस्लीम समाजाची वस्ती आहे. आमचे पाच खोल्यांचे घर आहे व पुढच्या खोलीत दुकान आहे. आम्ही घरात बसलेला असल्यास बाहेरुन कोणी आवाज दिला तर तो आम्हाला ऐकू येतो.

४. गोपाळ सावंत हे माझे चुलते व जयश्री ही माझी चुलती होती. हे म्हणणे खरे नाही की वाटणीवरुन माझ्या वडिलांचे व माझ्या काकाचे बऱ्याच वेळेला वाद होत होते. हे म्हणणे खरे नाही की आमचे वाटप होवून आम्ही स्वतंत्र राहत होतो. माझ्या सख्ख्या चुलत भावांची नावे प्रमोद, युवराज व अर्जुन अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की प्रमोद हा दिव्यांग असून त्याला हिंडता फिरता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की त्याला स्वतःची कामे करण्यास त्रास होत असल्याने त्याच्यासोबत एक माणूस लागत होता. हे म्हणणे खरे नाही की प्रमोद हा दिव्यांग असल्याने तो आरोपी क्र. १ च्या घरचे टॉयलेट वापरत होता.

५. आमच्या घरापासून पोलिस ठाणे २ ते २.५ किमी अंतरावर आहे. माझ्या घरासमोर २० फुटांचा रस्ता आहे. घटनेच्या वेळी रस्त्यावरील लाईट चालू होती. भांडणे चालू झाली त्यावेळेस बरेच लोक जमा झाली होती. मी आवाज ऐकून घरातून बाहेर आलो

त्यावेळेस बरेच लोक जमलेले होते. हे म्हणणे खरे नाही की मी बाहेर आल्यानंतर मला कोणाचे भांडण चालू आहे हे लगेच लक्षात आले नव्हते.

६. आरोपी क्र. १, ४ व ५ हे हळदीच्या कारखान्यात कामास जात असल्याबाबत मला माहिती नाही. आरोपी क्र. १ यांस दारुचे व्यसन आहे. तो दारुच्या नशेमध्ये बऱ्याच वेळा बडबडत असल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की बाळू कांबळेच्या बडबडीचा वडिलांना त्रास होत असल्यामुळे ते त्याला मारहाण करण्यास गेले होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की माझे वडिल त्यास विचारण्यासाठी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की आवाज ऐकून मी व माझा भाऊ घराबाहेर आलो व आम्ही बाळू कांबळेला काठीने मारले. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळेस बरेच लोक आले व त्यांनी सोडवासोडव केली.

प्रश्न – तुम्हाला घटनेबाबत फोन करुन पोलिसांना कळविण्यास कोणतीही अडचण नव्हती ?

उत्तर – वडिलांच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाल्यामुळे आम्ही पोलिसांना कळविले नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की आर्टिकल अ वरील काठयाप्रमाणे काठया सहजरित्या उपलब्ध होऊ शकतात. हे म्हणणे खरे नाही की आर्टिकल अ वरील काठया या आम्ही पोलिसांना दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या त्रासाला कंटाळून माझे वडिल आरोपीला मारायला गेले व आरोपींविरुध्द आम्ही खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

साक्षीदाराचा जबाब माझेसमक्ष नोंदवणेत आला.
श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

सांगली. ( आर. पी. कुलकर्णी )
दिनांकः ०७.०३.२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली